इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
मध्यवर्ती भांडार विभाग,
जाहीर दरपत्रक क्र. ०७/२०२६-२०२७

सन २०२६-२७ साठी राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल, इचलकरंजी मधील मुले व मुलींना गणवेश (ड्रेससेट) खरेदी करणेकामी व्यवसायीक व पुरवठाधारक/ मक्तेदार यांचेकडून दरपत्रक मागविणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचा तपशिल	निविदा रक्कम (GST सह)	बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फि	कामाची मुदत
१	सन २०२६-२७ साठी राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल, इचलकरंजी मधील मुले व मुलींना गणवेश (ड्रेससेट) खरेदी करणे बाबत.	९,९२,६४०/-	१०,०००/-	५०० + GST	३० दिवस

वरील कामासाठी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे. तसेच कामासंबंधी माहिती मध्यवर्ती भांडार विभागाकडे मिळेल.

अ) तांत्रीक बोलीसाठी कागदपत्र

१) बयाणा रक्कम रु. १०,०००/- इचलकरंजी महानगर पालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत / सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या शाखेतील धनाकर्ष (डी.डी.) इचलकरंजी शहर महानगरपालिका या नावाने काढणेचा आहे.
२) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.
३) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र
४) निविदाकाराच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबत कुल मुखत्यारपत्र अभिकर्ता अधिकृत असलेचा पुरावा.
५) मक्तेदाराचे पॅनकार्ड याची सत्यप्रत.
६) पदाधिका-यांचा सहभाग नसलेबाबतचे प्रमाणपत्र.
७) वित्तीय समर्थनार्थ कागदपत्रे
८) IT रिटर्न कागदपत्रे
९) म.न.पा. साहित्य पुरवठा केलेचा अनुभव दाखला.
१०) मक्तेदाराने जोडावयाचा फॉर्म 1B (५00 रुपये स्टॅम्पवर)

ब) **लिफाफा क्र. ०२ मधील खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.**

१) दरपत्रक अंदाजीत रक्कमेच्या पर्सेंटेज (टक्केवारी) दराने अंकी व अक्षरी नमुद करावे.
२) शासन निर्णयानुसार एस्टीमेट दरापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झालेस राष्ट्रीयकृत बँकहमी / D.D. हे टेंडर मंजूरीपुर्वी इचलकरंजी महानगरपालिकेत तात्काळ सादर करावी लागेल.

अटी व शर्ती

१) ज्याची निविदा मंजुर होईल त्याचे बिलातुन ९% इतकी रक्कम डिपॉझीट पोटी कपात करुन घेतली जाईल. व काम पूर्ण झालेनंतर सहा महीन्याने परत केले जाईल. तसेच बयाणा व सुरक्षा रकमेवर व्याज मिळणार नाही.
२) कोरी निविदा मध्यवर्ती भांडार विभागाडे दि.०४/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासुन दि. १२/११/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मिळेल.
३) दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार महानगरपालिकेकडे राखून ठेवणेत आलेला आहे. याची कोणतेही कारणे दिली जाणार नाहीत.
४) सदर कामाची सविस्तर माहिती म.न.प. http://ichalkaranjimnp.in/ या संकेतस्थळावर दि.०४ /११/२०२६ पासून ते दि. १२/११/२०२६ अखेरदुपारी २ .०० वाजेपर्यंत पाहणेस मिळेल. तसेच देणेत येणारे दरपत्रक भांडार विभागाकडील टेंडर पेटीमध्ये दि. १२/११/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. शक्य झालेस निविदा दि.१२ /११/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडणेत येईल.
५) कामाचे अंदाजपत्रक तसेच अटी व शर्ती बाबत अधिक माहिती महानगरपालिकेच्या जुनी इमारत कडील मध्यवर्ती भांडार विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

अधिक्षक भांडार विभाग	मुख्य लेखापरिक्षक	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	उपायुक्त	अति.आयुक्त
	2/11/2026	3/11/2026		